# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक 06.07.2012 (का.प.क्र.-05) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक 06.07.2012 रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त,श्री.अजय चारठाणकर, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाहासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
11. स. श्री. खान अक्रम करीम खान
12. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
13. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
14. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री.बाळासाहेब मुंडे** :30 तारखेच्या पावसामुळे नागरीकांच्या घरात पाणी घुसले, कालच सर्व पदाधिकारी आणि अधिकारी यांनी नाल्याची पहाणी केली आहे. नाल्याची मार्कीग करून तातडीने आदेश देण्यात यावे.

**मा.सभापती** :मा.जिल्हाधिकारी यांनी मार्कीगसाठी त्यांची मॅनपावर कामाला लावले आहे. सदरील कामाबाबत काय प्रोग्रेस झालेली आहे मा.आयुक्त यांचेकडुन जाणुन घेऊ.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :जयभवानी नगर येथे 9 मिटर नाल्याच्या बाजुला बिल्डरने अतिक्रमण करून बांधकाम केलेले आहे.

**उपअभियंता** :जयभवानी नगर येथील नाल्याची विडथ् माहिती नाही. सिडकोकडुन माहिती करुन माहिती देण्यात येईल. जय भवानीनगर हा ऐरीया डी नोटीफाय एरिया आहे. त्यामुळे त्याचा प्लॅन आपल्याकडे नाही.

**श्री.नारायण कुचे** :सिडकोने 9 मिटर सोडुन बांधकामाची परवानगी दयावयाची ठरले होते. जागेवर नाला 3 मीटर राहीलेला आहे. त्यामुळे जय भवानी नगरमध्ये पाणी घुसलेले आहे.

**मा.सभापती** :थोडया वेळानंतर माहिती देण्यात यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :दशमेशनगर येथील नाल्यावरील पुलावरुन वर्दळी असलेले वाहने जातात. त्याची रूंदि कमी कमी होत आहे. डापे काढण्यात यावे. नाल्यावर अपार्टमेंट बांधण्यात आलेले आहे. त्याची दुरूस्ती करण्यात यावी. नाला रूंदिकरणाअंतर्गत मार्कींगमध्ये ज्योतीनगर नाल्याचा समावेश करण्यात यावा.

मा.सभापती :या नाल्याचाही मार्कींगमध्ये समावेश करण्यात यावा.

श्रीमती प्राजक्ता राजपुत: नाल्यावर अतिक्रमण होत आहे. प्रणव प्लाझा खडकेश्वर नाल्याची पहाणी करण्यात यावी. नाल्याची सफाई न केल्यामुळे पावसाचे पाणी नागरीकांच्या घरात, दुकांनामध्ये शिरत आहे. कंत्राटदारांना नाले सफाईचे काम का देण्यात येते. अशा कंत्राटदारांना काम देण्यात येऊ नये त्यांना ब्लॅकलिस्ट केले पाहिजे.

श्री.समीर राजुरकर :मलबा उचलण्याचे टेंडरमध्ये अट टाकली गेली पाहिजे. त्या नंतर सदरील कामाचे ऑडिट केले पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :नाल्यावरील अतिक्रमण काढले गेले पाहिजे. नाला सफाईसाठी सुमारे दिड कोटी रूपये देण्यात येतात परंतु नाल्यातील फक्त प्लॅस्टिक बाजुला काढले जाते. मागील काळात दोन जेसीबी, टिप्पर, तीन ते चार मजूर व एक जे.ई नाला सफाईसाठी ठेवण्यात आले होते. सदरील पथक हे वर्षभर कार्यरत असले पाहिजे. जेनेकरून नालेसाफसफाईचा विषय सभागृहात दरवेळेस येणार नाही. अतिक्रमणामुळे झांबड इस्टेट येथील घरांमध्ये पाणी शिरले होते. नाला सफाई वर्षभर केल्यामुळे वेळेवर होणारी धावपळ होणार नाही. यावर कायमस्वरूपी मनपाचे पथक कार्यरत ठेवण्यात यावे व वर्षभर मनपातर्फे नालेसफाईचे काम करण्यात यावे.

मा.आयुक्त :दरवर्षी नाले सफाईचा विषय गंभिर होत आहे. आवश्यकते प्रमाणे तात्पुरती नालेसफाईसाठी डागडुगी करण्यात येते.नाल्यातील गाळ काढणे, संरक्षक भिंत बांधणे, नाल्याची खोली वाढविणे हा कार्यक्रम मोठा आहे. शासनाकडे यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. नाले सफाईसाठी वर्षभर पथक नेमण्याची कार्यवाही शहर अभियंता यांनी करावी. वेगवेगळया नाल्यांची अतिक्रमणांची पहाणी केली जात आहे. शहरातील जे शिल्लक राहीलेले अतिक्रमण आहेत त्याची पहाणी करून एकत्रित कार्यक्रम घेणार आहोत. नाले रूंदिकरणाची मोहिम महानगरपालिकेला हाती घ्यावी लागणार आहे. नाल्यांची रूंदिविषयी सन 2007 मध्ये मोजणी झाली होती. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सिटी सर्वे ऑफिसला 20 लाख रूपये मोजणीसाठी मंजूर केलेले आहे. 6 पथके मोजणीसाठी त्यांनी लावलेली आहेत. काही खाजगी माणसे लावुन 6 नाल्यांची मोजणी करावयाची आहे. हजारोंच्या संख्येने अतिक्रमणे असणार आहे ते आपल्याला काढावे लागणार आहे. जे अतिक्रमण नाल्याच्या मधोमध आहे मोजणीची गरज नाही. ते अतिक्रमण काढण्यासंदर्भात ताबडतोब आदेशीत केलेले आहेत. ज्या ठिकाणी व्हिजीट देण्याची राहीलेली आहे त्या ठिकाणी व्हिजीट देण्यात येईल. ज्याठिक्‍णी रिकामे प्लॉटधारक प्लॉट रिकामे पडलेले आहे त्या ठिकाणी पाणी साचते त्यांना नोटीस देण्याचे सांगीतलेले आहे. मनपाच्या पथकाचा वापर जोरदार करण्यात येईल. या पथकाने वाळुचे 18 ट्रॅक्टर जमा केलेले आहे त्यांचे अभिनंदन करायला हवे. रस्त्यावर पडलेले मटेरियल काढणार आहे. त्यांना

नोटीशी बजावणार आहे. 11 सोनोग्राफी सेंटर सिल केलेले आहे. शासन यासदंर्भात संवेदनशील आहे. विभागीय आयुक्तांचे रोज व्हिडीओ कॉन्फरन्सी होत आहे.

श्री.मोहन मेघावाले :सलीम अली सरोवर येथील सौदर्यकरणाबाबत तसेच सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट, ॲग्रीमेंट बाबत माहिती विचारणा करण्यात आली होती अद्यापपर्यंत माहिती अप्राप्त आहे. ॲग्रीमेंट नुसार कार्यकाळ संपलेला आहे. जी मुदतवाढ देण्यात आली ती कुणाच्या मंजुरीनुसार देण्यात आली. तसेच जे अतिरिक्त काम देण्यात आले आहे त्याबाबत मा.सर्वसाधारण सभा व स्थायी समती सभा यांची मंजूरी घेण्यात आली होती का? विकासाच्या कामाकरीता लोकप्रतीनिधीवर नागरीकांचा विश्वास राहणार नाही. सदरील काम व्यवस्थित चालु आहे किंवा नाही याबाबत स्थळ पहाणी करण्यात यावी. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(पा/पु):एसटीपी 5 एमएलडी क्षमतेचे एसबीआर टेक्नोलॉजी वर आधारीत एसटीपी उभारणा करीत आहे. टेंडर कॉस्ट 6 कोटी 87 लाख 30 हजार अशी आहे. कामाचा कार्यादेश 27.11.2009 रोजी देण्यात आला होता. कामाची मुदत 2 वर्षाची होती. वाढीव मुदत 30 जुन पर्यंत दिलेली होती. आर्थिक तरतुद मराठवाडा विकास कार्यक्रम 2007 नुसार शासनाच्या अनुदानातुन करण्यात आलेला आहे. याकामासाठी आजपर्यंत 4 कोटी 10 लाख खर्च झालेला आहे. निविदेमध्ये समाविष्ट असलेली सिव्हरेज कलेक्शन सिस्टीम, पंपीग स्टेशन, राईझींग मेन एसटीपी उभा करणे आणि एसटीपी सुरू झाल्यानंतर सदरील व्यक्तीकडुन 5 वर्षासाठी चालविणे अशा प्रकारच्या तरतुदी त्यामध्ये आहे. 2 कोटी रूपयांचे अतिरिक्त काम नाही. फक्त 20,39,674/- रूपयांचे एक्ट्रा एटम केलेले आहे. त्याचे कारण म्हणजे सर्व ड्रेनेज लाईन एकत्रित करुन ते एसटीपीमध्ये घेत आहोत. सिडकोने टाकलेल्या लाईनस्च्या लेवल बरोबर नव्हत्या. 100 ची लेवल घेतलेली आहे. लेवल चेक केलेली आहे. मेनलाईनवर व येणाऱ्या ब्रॅन्चेस लाईन खालच्या बाजुला होत्या. त्यामुळे काही बदल करणे आवश्यक होते. ड्रेनेजमधला प्रत्येक थेंब ना थेंब एसटीपीमध्ये यावा व त्याची ट्रिटमेंट होऊन सलीम अली सरोवरमध्ये सोडण्यात येईल. मोठा प्रोजेक्ट असल्यामुळे जास्त वेळ लागला आहे. त्यामुळे मुदतवाढ दिलेली आहे. ऑगस्टमध्ये एसटीपी कार्यान्वित झालेला असेल.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरील खुलासा समाधानकारक नाही. सभेची परवानगी न घेता मुदतवाढ दिली आहे. तसेच 20 लाखाचे काम करण्यात आले. दोन दोन लाखांची कामे वार्डात होत नाही. त्यामुळे 20 लाखाची रक्कम मोठी आहे. एसटीपी प्लॅन डिझाईनिंग करतांना वस्तुस्थिती लक्षात घेतली नाही काय? त्यावर पीएमसी नेमण्यात आली असेल. या सर्व बाबींचा सविस्तर खुलासा केला गेला पाहिजे. ड्रॉईंग डिझायनिंग केली त्यांची काही जबाबदारी आहे.

मा.सभापती :सन 2009 ची वर्क ऑर्डर आहे. दिनांक 27.11.2011 रोजी मुदत संपलेली आहे. त्यानंतर 30.06.2012 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. 7 महिन्यांची मुदत वाढुन देण्यात आली तरही काम अजुन संपलेले नाही. पीएमसीला 2% ने नेमुन दिलेले आहे. सुरवातीस 72 लाख ॲडव्हान्स

दिलेले आहे. 1 कोटी 24 लाख, त्यानंतर 2.40 आणि नंतर 1.17 रक्कम देण्यात आलेली आहे. फंडींग कशा पध्दतीने झाले आहे. तसेच महानगरपालिकेचा किती वाटा आहे. खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(पा/पु):मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत एकणु 25 कोटी रूपयांचे कार्यक्रम होता. 75:25 असे फंडिग होते. 75 टक्के मनपाचे व 25 टक्के शासनाचे असे निर्देशनास आल्यानंतर शासनाशी पत्रव्यवहार केला की, हे चुकून झाले का? सर्वसाधारणपणे 75 शासनाचे आणि 25 टक्के मनपाचे असे असायला हवे होते. मनपाची आर्थीक स्थिती बरोबर नसल्याचे शासनास कळविण्यात आले. त्यानुसार मा.सचिव यांनी एक एसटीपी चांगल्याप्रकारे करुन दाखविण्याचे सांगण्यात आले. ऑगष्टमध्ये एसटीपीचे उद्घाटन करू शकतो अशा पध्दतीने काम करू शकतो. अंदाजपत्रक आहे कमी जास्त होत असत.

श्री.रेणुकादास वैद्य :Quantity मध्ये Variation समजू शकतो. लेवलच मॅच होत नाही. पीएमसीने कशा पध्दतीने डिझाईन केले आहे.

श्री.समीर राजुरकर :चिफ सेक्रेटरी सोबत चर्चा केल्यानंतर शेवटी ठरले काय?

कार्यकारी अभियंता(पा/पु):In Principal रक्कम वापरू शकतात. Utilization Certificate जेव्हा देऊ त्यामध्ये ते देवुन टाकु.

श्री.समीर राजुरकर :4 कोटी 10 लाख कुणाच्या फंडातुन देण्यात आलेले आहे.

कार्यकारी अभियंता(पा/पु):शासनाच्या फंडातुन अदा केलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :20 लाख खर्च करत असतांना मा.सर्वसाधारण सभा व मा.स्थायी समिती सभेची मंजूरी घेण्यात आली होती का?

कार्यकारी अभियंता(पा/पु):25 लाखाच्या आतील विषय असल्यामुळे मा.आयुक्त्यांच्या अखत्यारितील विषय आहे त्यांची मंजूरी घेण्यात आलेली आहे.

मा.सभापती :नियमाप्रमाणे रक्कम 25 लाखाच्या खालील कामांची मंजुरीची माहिती सभेला देणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता(पा/पु):20 लाखाचा खर्च शासनाच्या अनुदानातुनच झालेला आहे.

मा.सभापती :मनपामतध्ये सक्षम अधिकारी असुनही आपण पीएमसी नेमुन योग्यरितीने कामाचे डिझाईन होईल हे पाहिले जाते. पीएमसी सगळीकडे एक फॅशन झाले आहे. पुर्वी पीएमसी कुणाला माहित नव्हते. मनपातील अधिकारीच सर्व काम करीत होते. प्रॉपर गाईडलाईनसाठी पीएमसीची नेमणुक केली जाते. मुदतवाढ देतांना गुत्तेदारास फाईन लावण्यात आला नाही. अदा रक्कम होऊनही काम मुदतीत होत नाही. यास पीएमसी आणि गुत्तेदार जबाबदार आहे.

कार्यकारी अभियंता(पा/पु):काही गोष्टी समन्वयाने कराव्या लागतात. काम सुरू झाल्यानंतर काही अडचणी लक्षात येतात.

मा.सभापती :अशा पीएमसी नेमण्यात येवु नये. पीएमसी साईड व्हिजिट करत नसेल. सक्षम अधिकारी असतांना एक्ट्रा रक्कम देण्यात येत आहे. टाईम बॉन्ड कार्यक्रम पाहिजे. पुढे शासनाकडे फंडींगला अडचणी येतात. गुत्तेदाराकडुन लेखी खुलासा मागविण्यात यावा. जोपर्यंत खुलासा येत नाही. तोपर्यंत देयक अदा करण्यात येवु नये. गुत्तेदार व पीएमसीचा खुलासा येणाऱ्या बैठकीत ठेवण्यात यावे.

श्री.मोहन मेघावाले :उद्यानाचे सौदर्यकरणाची माहिती अप्राप्त आहे.

कार्य.अभियंता :सुशोभिकरणाचे 90 टक्के काम झालेले आहे. दोन महिण्याचे काम बाकी आहे. सदरील काम मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात आलेला आहे. 50:50 टक्के असा फंडींग आहे. यामध्ये आर्कीटेक आहे.

श्री.समीर राजुरकर :स.सदस्यांनी माहिती मागीतली असता ती देण्यात यावी.

कार्य.अभियंता :सदरील कामासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मा.सभापती :त्या ठिकाणी सडलेले लाकुड वापरण्यात आलेले आहे. पुढील सभेत सविस्तर माहिती सादर करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :गेल्या तीन स्थायी समितीमध्ये आस्थापना विभाग-2 बाबत चर्चा सुरू आहे. कर्मचाऱ्याची बदली झाल्यावर कपाटाला कुलूप लावून आठ दिवस ते कुलूप उघडु देवु नये त्यासाठी संचिका पुटअप व्हावी. एवढी शिस्त मनपामध्ये राहिली नसल्यास स.नगरसेवकांनी वरिष्ठ लिपीक यांना कोणते कामे सांगावे. सदरील विषय एका व्यक्तीचा नसुन महानगरपालिकेचा विषय आहे. कर्मचाऱ्यांना शिस्त नसेल तर मुख्यालयात येणाचे कामच राहणार नाही. शिस्त मोडणाऱ्यांना स्पेअर केल्यास याची परंपरा सुरू होईल. सदरील विषयात गंभिर ॲक्शन झाली पाहिजे. गंभिर कारवाई झाली पाहिजे.

श्री.बाळासाहेब मुंडे :कपाटाची चावी देवु शकत नाही हि शोकांतिका आहे. तेथील अधिकारी काय करतात.

श्री.समीर राजुरकर :सदरील कपाटात असलेल्या संचिकामुळे चावी देण्यात येत नाही. आर्थिक देवाणघेवाणीचा प्रकार आहे. आमच्या बोलण्यात तथ्य आहे.

श्री.जाधव :चावी न देण्यामागे कारण काय? रिलिव्ह केल्यानंतर सदरील कर्मचारी रुजू का होत नाही. दोन दिवसात रूजू होत नसेल तर त्यावर ठोस कारवाई केली पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :मागील स्थायी समितीत आस्थापना विभाग-2 कसा चालतो या विषयी सांगण्यात आले होते. अनुकंपा आणि लाडसमितीच्या प्रकरणाच्या खोलात गेल्यास हे प्रकरण गंभिर होईल. सर्वांना निलंबीत करावे लागेल अशी वेळ आणु नका. सदरील कर्मचाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

आस्थापना अधिकारी-2: श्री.एम.बी.खरे याची स्थायी समितीच्या आदेशानुसार मा.आयुक्तांनी आस्थापना विभागातुन दिनांक 29 तारखेला बदली झाली असुन बदलीच्या ठिकाणी जाण्यासाठी कार्यमुक्ती आदेश देण्यात आले परंतु बदलीच्या ठिकाणी रूजु होण्यास टाळाटाळ केली व आरेरावी केली.

श्री.समीर राजुरकर :सदरील कर्मचारी यांचेवर कडक कारवाई केली पाहिजे.

मा.सभापती :स्थायी समितीने सदरील कर्मचाऱ्यास मागील स्थायी समितीमध्ये माफी देवुन एक संधी देण्यात आली होती. परंतु आरेरावीची भाषा केली. काम करत असतांना सर्व अधिकारी कर्मचारी यांनी मानसन्मान ठेवला पाहिजे. हा विषय गंभिर आहे. प्रशासनाकडुन नागरीकांचे कामे झाले पाहिजे. अनुकंपा/लाड समितीच्या प्रकरणांची चौकशी केल्यास ती गंभिर स्वरूपाची असेल. परंतु जे झाले ते झाले पुढे चांगले व्हावे म्हणून सभागृहाने निर्णय दिला. सदरील विषयावर मा.आयुक्तांनी योग्य निर्णय घ्ेण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :मागील बैठकीतच सांगण्यात आले होते की, शिस्त भंगाची कार्यवाही करण्यात यावी. निलंबन हा पर्याय नाही. शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :कलम 56 प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसा प्रस्ताव सभागृहापुढे आणण्यात यावा. त्यात शिस्त भंगाची कारवाई करण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :स.सदस्य श्री.अनिल जैस्वाल यांच्या प्रभागातील हा प्रश्न आहे. आंबेडकर चौकामध्ये काही अनाधिकृत मटन शॉप आहे. या लोकांना काही शिस्त नाही. त्या भागात 7 मंदिर आहे. यामुळे सदरील भागातील नागरीकांना त्रास होत आहे.सदरील मटन शॉप अधिकृत आहे का की अनाधिकृत आहे. कारवाई केव्हा करणार. खुलासा करण्यात यावा.

**श्री.समीर राजुरकर** :आस्थापना 2 विषयी मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा.प्र.आयुक्त** :आस्थापना 2 विभागातील कर्मचारी यांचे बाबत मागील स्थायी समितीमध्ये समज देण्यात आली होती. काल जो प्रकार घडला आस्थापना 2 विभागामध्ये घडला. त्यानुषंगाने सभागृहाच्या भावना लक्षत घेऊन त्यांचेवर कारवाई करून सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

**पशुसंवर्धन अधिकारी** :अवैध मांस विक्रिच्या संदर्भांत वारंवार तक्रारी निर्माण होता आहे. स.सदस्य श्री.अनिल जैस्वाल यांची तक्रार प्राप्त झालेली आहे. उपलब्ध असलेल्या पथकामध्ये एक एस.आय आणि एक मजुर आहे. किमान या पथकामध्ये पाच लोकांची गरज आहे व पोलीस संरक्षणाची गरज आहे. प्रशासनाकडे कर्मचाऱ्यांची मागणी केलेली आहे. तसेच पोलीस बंदोबस्तासाठी मा.पोलीस आयुक्तांना मागणी केलेली आहे. पथक सक्षम झाल्यावर कारवाई करणे शक्य होईल.

**मा.सभापती** :विभागात एकुण कर्मचारी किती?

**पशुसंवर्धन अधिकारी** :विभागात 56 कर्मचारी कार्यरत आहे.

**श्री.विजेंद्र जाधव** :या कर्मचाऱ्यांकडुन कारवाई करणे शक्य आहे. अधिकारी यांना मटनाच्या दुकांनावरून हप्ते भेटत आहे.

**मा.सभापती** :सदरील कर्मचाऱ्यामधुन पाच कर्मचारी घेऊन राऊंड घेता येईल.

**पशुसंवर्धन अधिकारी** :असेच केले जात आहे.

**श्री.नारायण कुचे** :सदरील शॉपवर गेले असता नगरसेवकांनी कारवाई करण्यास सांगीतले आहे? असे सांगीतले जाते. शॉपवर कारवाई केली का?

**पशुसंवर्धन अधिकारी** :तीन लाईसन दिलेले आहे. दोन अधिकृत व एक अनाधिकृत आहे. शहरात 100 पेक्षा अधिक अनाधिकृत दुकाना आहेत.

**श्री.विजेंद्र जाधव** :पडेगांव येथे एका कर्मचाऱ्याला पैशाची मागणी केली म्हणुन मारहान करण्यात आली.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सदरील आरोपात काही तरी तथ्य असेल. शहरात 100 पेक्षा अधिक अनाधिकृत दुकाना आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. पुरेसा कर्मचारी आणि पोलीस बंदोबस्त देण्यात यावा. मनपाचे उत्पन्न बुडत आहे.

**श्री.विजेंद्र जाधव** :अनाधिकृत दुकानांना लाईसन देण्यात यावे जेणेकरून मनपाचे उत्पन्न वाढेल.

**श्री.मोहन मेधावाले** :धर्मस्थळाच्या आजुबाजूला मटन शॉप नसावे.

**श्री.समीर राजुरकर** :56 कर्मचाऱ्यांकडून पथक निर्माण करून कारवाई करण्यात यावी.

**पशुसंवर्धन अधिकारी** :पुरेसा कर्मचारी वर्ग आणि पोलीस संरक्षण दिल्यास एका आठवडयात सर्व बंद करण्यात येईल.

**मा.सभापती** :सुट्टीच्या दिवशी कारवाई करण्यात यावी. जे शॉप आहे त्यांना दंड लावुन परवानगी देण्यात यावी.

**श्री.आगा खान** :रिनिवलसाठी किती लाईसन्स कित्येक दिवसांपासून पडलेले आहे.

**पशुसंवर्धन अधिकारी** :ज्यांचे कागदपत्र पुर्ण आहेत त्यांचे एकही प्रकरण प्रलंबित नाही.

**मा.सभापती** :मनपाच्या कर्मचाऱ्यांची वसुली असे वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे.

**पशुसंवर्धन अधिकारी** :सदर प्रकरणात गुन्हा दाखल झाला पाहिजे होता. आधि मासविक्री दुकांनावर कारवाई केली होती. त्या ठिकाणी ट्रॅप रचला होता. सदरील कर्मचारी यांना त्या कामापासून दुर केले व निलंबीत करण्याबाबत आस्थापनेकडे प्रकरण वर्ग करण्यात आले. 24 तासात कारवाई करून अहवाल देण्यात येईल.

**मा.सभापती** :कर्मचारी देण्यात येईल.

**श्री.समीर राजुरकर** :बीओटीच्या लाईटचे सेव्हिंग झालेले लाईटचे ऑडिट करण्यात आलेले आहे का? सेव्हिंग झालेल्या लाईच्या 70 टक्के रक्क्म गुत्तेदाराला व 30 टक्के रक्कम मनपाला असा करार झालेला आहे. दर महिन्याला ऑडिट केलेले आहे का? जी रक्कम दिली जाते ती कशाच्या आधारे दिली जाते.

**श्री.नारायण कुचे** :बीओटी गुत्तेदाराला देयक अदा केले आहे का?

**कार्यकारी अभियंता(वि)** :बीओटीचे 9000 लाईट असुन 5000 शहराचे व 4000 सिडकोचे लाईट आहे. टी पाईव्ह चे लाईट लावण्यात आलेले आहे. 96 वॅटमध्ये किती एनर्जी सेव्हींग होत आहे. त्याचे कॅलक्युलेशन केलेले आहे. 67 गुत्तेदाराला व 33 मनपाला असे आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सोप्या भाषेत सांगण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता(वि)** :150, 250 वॅटचे लाईट काढण्यात आलेले आहे. त्याच्या ऐवजी 4 बाय 24 टि पाईव्ह लावलेले आहे. 98 मध्ये 52 कि.वॅट वेव्हींग होत आहे.

**श्री.समीर राजुरकर** :चार पैकी एक लाईट बंद असल्यास त्याचे वेटेज किती असते. महिण्याला 50 हजार रूपये बिल 150 वॅटचे येत होते तर ते आता बीओटी लावल्यानंतर किती बिल येते. सोपा प्रश्न विचारल्यावर अवघड उत्तर दिले जाते. शहरातील 9000 पोल पैकी 5000 पोल कायम बंद ठेवले जातात. जालना रोड वरील लाईट आठ आठ दिवस बंद असतो. 96 वॅटमध्ये चार पैकी दोन दोन टयुब सुरू आहे. ते सेव्हिंगमध्ये कॅलक्युलेट केले जात नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :थेअरी सांगण्यापैक्षा प्रॅक्टीकली शहरात काय चालले हे सांगण्यात यावे. जे लाईट लावले त्यापैकी किती चालु किती बंद चालु असल्यापैकी टयुब किती चालु, त्याची सेव्हिंग किती होते ते सांगण्यात यावे. सेव्हींगचे पैसे यामध्ये कॅलक्युलेट करून दिले जाते का?

**श्री.रेणुकादास वैद्य** :बीओटी चार वर्षामध्ये दंडात्मक कारवाई केलेली रक्कम सांगण्यात यावे.

**श्री.समीर राजूरकर** :आऊटपुट काहीच नाही.

**मा.सभापती** :चार टयुबचे किती चालु आहे. 9500 पैकी किती वर्कींग आहे.

**कार्यकारी अभियंता (वि)**:10 ते 15 टक्के लाईट बंद आहे.

**श्री.समीर राजूरकर** :सर्व कागदपत्र घेऊन ऑडिट करण्यात यावे. बीओटीमध्ये पुणे,मंबई व इतर शहर नफयामध्ये आलेले आहे. गंभीर ॲक्शन न घेतल्यामुळे अशी परिस्थिती उद्‌भवत आहे. ऑडिट झाले पाहिजे. कारवाई झाली पाहिजे.

**कार्यकारी अभियंता (वि)**:100 पैकी 5 लाईट बंद असु शकतात त्यात टॉलेरन्स फॅक्टर आहे. 20 लाईट बंद असल्यास 15 लाइट चा फाईन लावला जातो.

**मा.सभापती** :अहवाल कोण देतो.

**कार्यकारी अभियंता(वि)**:इंजिनिअर, लाईनमन रिपोर्ट करतात.

**मा.सभापती :लाईनमचे आदेश अजुनपर्यंत निघालेले नाही.**

**श्री.समीर राजुरकर :15 टक्के लाईट बंद असतात. सेव्हिंगमध्ये कसे कॅलक्युलेट करू शकतात.**

**कार्यकारी अभियंता(वि):9500 साठी दोन गाडया आहेत.. महिण्याचा रिपोर्ट विभागाकडे असतो.**

**श्री.समीर राजुरकर :ॲग्रीमेंटनुसार कामे झाले पाहिजे. सेव्हींगचे ऑडीट झाले पाहिजे. लाईनमनने फिल्डवर जाऊन रिपोर्ट दिला पाहिजे परंतु असे कुठेही होत नाही.**

**श्रीमती प्राजक्ता राजपुत:माझ्या वार्डातील मुख्य रस्त्यावरील लाईट नेहमी बंद असतात.**

**मा.सभापती :कर्मचाऱ्यांचा पुरेपुर वापर होत नाही.**

**श्री.नारायण कुचे :मेंन्टनन्स म्हणुन काही बिल अदा करण्यात आलेले आहे का?**

**श्री.रेणुकादास वैद्य :आठ दिवसाचा वेळ देण्यात यावा. प्रत्येक वार्डाला लाईनमन आणि डायरी देण्यात यावी व सर्व रेकॉर्ड ठेवण्यात यावा. आठ दिवसानंतर या शहरातील 9500 पैकी 9000 लाईट सुरू आहे असा रिपोर्ट देण्यात यावा यानंतर स.सदस्य याची पहाणी करून कारवाई करण्यात यावी.**

**मा.सभापती :लाईनमनच्या ऑर्डर देण्यात याव्या.**

**श्रीमती प्राजक्ता राजपुत: सांस्कृतिक मंडळासमोर ड्रेनेज लाईन चोकअप झालेले आहे. चार ते पाच दिवसांपासून चोकअप होत आहे.**

**श्री.समीर राजुरकर :हा प्रश्न नेहमीचा आहे प्रश्न सोडविण्यात यावा.**

**श्री.रेणुकादास वैद्य :ड्रेनेज लाईन सरळ टाकल्यास अंजली टॉकीजच्या सरळ टाकण्यात यावा. म्हणजे हा प्रश्न सुटेल.**

**शहर अभियंता :सदर कामाच्या ठिकाणी जेटींग मशीन लावुन काम करण्यात येत आहे. सांस्कृतिक मंडळातुन लाईन गेलेली आहे. पुढे आमदार साहेबांच्या ऑफिसच्या पाठीमागुन खाली लाईन गेलेली आहे. त्यामुळे चोकअप झाल्यास लवकर निघत नाही. लाईन सरळ नेता आली असती. परंतु ते काम अवघड आहे.**

**मा.सभापती : सदरील काम करण्यात यावे.**

**श्री.बाळासाहेब मुंडे :सुवर्ण जयंती रोजगार योजने बाबत व लाभार्थी बाबत माहिती देण्यात यावी.**

**मा.सभापती :पुढील सभेत वार्ड वाईज मागील दोन वर्षातील लाभार्थी यांची सविस्तर माहिती सादर करण्यात यावी.**

**श्रीमती सविता घडमोडे :तोरणागड येथील मा.आमदार निधीतुन सभागृहाच्या बांधकाम आहे. जुने सभागृह तोडुन करण्यात येत आहे. स्थायी समितीची परवानगी घेतली आहे का?**

**कार्यकारी अभियंता :एनओसी आमच्या विभागामार्फत देण्यात आलेली आहे. नविन सभागृह बांधण्याची परवानगी दिलेली आहे. तोडण्याची परवानगी दिलेली नाही.**

**श्री.नारायण कुचे :प्रशासनाने स्थळभेट देऊन पहाणी केलेली आहे का?**

**मा.सभापती :टाऊन प्लॅनिंग विभागातुन अभिप्राय घेण्यात आलेला आहे का की किती टक्के बांधकाम करू शकतो. 10 टक्के वापराबाबत.**

**कार्यकारी अभियंता :याबाबतची संपूर्ण माहिती पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.**

**श्री.समीर राजुरकर :संपूर्ण माहिती स.सदस्या आणि सभापती यांना देण्यात यावी.**

**श्री.गिरजाराम हाळनोर :ओपन स्पेसचा एरिया किती. टाउन प्लॅनिंगची परवानगी घेतली का?**

**शहर अभियंता :अनाधिकृतरित्या विकास झालेला आहे.**

**कार्यकारी अभियंता :पुढील बैठकीत सविस्तर माहीती देण्यात येईल.**

**मा.सभापती** :पुढील बैठकीत माहीती देण्यात यावी. कलेक्टर ऑफिसच्या सरळ रोड नेहरू नगर पर्यंत येतो त्या रोडवर तत्कालिन आयुक्त यांनी चौकाचे सौदर्यकरण करण्यात आले होते. नेहरूभवन येथे काम चालु आहे. त्या लेफ्टटर्न व्यवस्थित करण्यात यावा. तसेच संत एकनाथ रंगमंदिर आणि जिल्हाधिकारी कार्यालय ते नेहरू भवन येथील लेफ्ट टर्न व्यवस्थित करणे.

**श्री.आगा खान मिया** : कैलास नगर येथील शाळेत शिक्षक देण्यात यावा. तीन दिवसांपासून मी स्वत: शाळेत भेट देत आहे परंतु शिक्षक त्या ठिकाणी उपलब्ध नाही.

**मा.सभापती** :कैलासनगर शाळेवर शिक्षक उपलब्ध करून देण्यात यावे. महानगरपालिका शाळेत शिक्षक,विद्यार्थी यांची संख्या, वर्ग, किती याचा अहवाल सादर करणे तसेच कैलास नगर शाळेत शिक्षकाची नेमणुक तात्काळ करणे.

**श्री.आगा खान मिया** :वार्ड ड मध्ये गढूळ पाणी येते. वार्ड सल्पायसाठी वार्ड ड मध्ये एकच अधिकारी आहे. 16 वार्डाची जबाबदारी एकाच जे.ई वर आहे. त्याऐवजी 16 वार्डाची जबाबदारीसाठी दोन जे.ई.देण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :संबधीत जे.ई यांचे बायपास झालेले आहे. ते कामही चांगले करतात. 16 वार्ड लेआऊट व स्लम भाग आहे. त्यामुळे त्याठिकाणी समस्या उद्‌भवते.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी जे मुद्दे मांडले त्यानुसार प्रश्न सोडविण्यात यावे.

**श्रीमती सविता घडमोडे** :माझ्या वार्डात पाण्याची समस्या असुन पाणी किती दिवसाआड येणार व किती वेळ येणार चार ते पाच दिवस वार्डात पाणी येत नाही.

**श्री.आगा खान मिया** :अग्निशमन अधिकारी यांचे बंधुनी अतिक्रमण केले असे वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. खुलासा करण्यात यावा.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :अतिक्रमण विभाग त्यांचेकडे देण्यात यावा.

**अग्निशमन अधिकारी** :संबधीत प्लॉट माझ्या भावाच्या नावे असुन संबधीत दोघांचा विषय आहे आणि प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यात माझा काहीहि संबध नाही. रोड आणि धार्मिक स्थळांचे अतिक्रमणाबाबत विषय माझ्याकडे असुन प्लॉटवरील अनाधिकृत बांधकामाबाबत कामे करण्याचे अधिकार माझ्याकडे नाहीत.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :शहरात मनपाच्या अनेक पाण्याच्या टाक्या आहेत त्याठिकाणी लाईनमन,वॉचमन आणि सेक्युरिटी गार्ड नसतात. त्यामुळे त्या ठिकाणी अनेक प्रकारचे गैरप्रकार घडतात. त्यामुळे अशा ठिकाणी ताबडतोब सेक्युरिटी गार्ड नेमण्याचे आदेश देण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :समांतर जलवाहिनीमुळे संबधीत अधिकारी यांना वेळ मिळत नसल्यामुळे पाणीपुरवठयाचा डिस्ट्रीब्युशन चार्ज पुर्ण वेळ देण्यात यावा.

**कार्य.अभियंता(पा/पू)** :समांतरचे काम मोठया प्रमाणात आहे. पाणीपुरवठयाच्या डिस्ट्रीब्युशन बाबत पुर्ण न्याय देऊ शकत नाही.

**मा.सभापती** :पाणीपुरवठाचा डिस्ट्रीब्युशनचा चार्ज डिस्ट्रयुब्युट करून श्री.कोल्हे यांचेकडे (कर आकारणी विभाग संभाळुन) देणेत यावा.

पाण्याच्या टाक्यांवर सुरक्षा रक्षक, वॉचमन नेमणे बाबत

**कार्य.अभियंता(पा/पू)** :45 टाक्याची सुरक्षा महत्वाची आहे. त्यावर सुरक्षा रक्षक आवश्यक आहे. याबाबात आस्थापना विभागाला मागणी केलेली आहे.

**मा.सभापती** :पाण्याच्या टाक्यांवर सुरक्षा रक्षक, वॉचमन नेमण्याबाबत लेखी पत्र देण्यात यावे.

**विषय क्र. 08 :** (विषय क्र. 06 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 25/06/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**
**टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)**

**मा.सभापती : विषय क्रमांक 8 स्थगीत**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 09 :**

**(दिनांक 20.06.2012 (का.प. क्र.43 दिनांक 30-5-2012 ची पुढे ढकललेली ) रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार -विषय क्रमांक-765)**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार औरंगाबाद महापालिका मुख्यालय ते चेलीपुरा पर्यंत मार्गे लोटाकारंजा विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन 2011-2012 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)दुरसुची नुसार रक्कम रूपये 62,12,340/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक 20.04.2012 विषय क्रमांक 718 अन्वये मान्यता प्राप्त आहे.**

**सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,**

**1. श्री.एस.एम.इब्राहीम - अंदाजपत्रका पेक्षा 33.21% जास्त**
**2. मे.नाज डेव्हलपर्स - अंदाजपत्रका पेक्षा 38.38% जास्त**

**तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकापेक्षा 33.21% जास्त दराची श्री.एस.एम.इब्राहीम यांची निविदा आहे. सदर जलनि:सारण वाहिनीचे काम पावसाळयापूर्वी कणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून 31 % जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.**

**करीता श्री.एम.एम.इब्राहीम यांची दराचे वाटाघाटीनुसार 33.21% जास्त ऐवजी 31% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 9 मंजूर.**

**श्री.समीर राजुरकर :अर्जंट केलेले कामे यामध्ये त्याची लेवल व इतर बाबी मेंन्टेन केले आहे किंवा नाही हे तपासण्यात यावे.**

**मा.सभापती :योग्य सुपरविझनने कामे झाली पाहिजे. विषय मंजूर**

**ठराव :**

**औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार औरंगाबाद महापालिका मुख्यालय ते चेलीपुरा पर्यंत मार्गे लोटाकारंजा विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम श्री.एम.एम.इब्राहीम यांचेकडून 33.21% जास्त ऐवजी 31% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 10 :**

**(दिनांक 20.06.2012 (का.प. क्र.43 दिनांक 30-5-2012 ची पुढे ढकललेली ) रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार विषय क्रमांक-767)**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मंडई या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन 2011-2012 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दुरसुची नुसार रक्कम रूपये 30,76,160/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक 20.04.2012 विषय क्रमांक 719 अन्वये मान्यता प्राप्त आहे.**

**सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत श्री.कदीर शे.रहीम यांची अंदाजपत्रका पेक्षा 49%जास्त दराची एक निविदा प्राप्त झाली. सदर जलनि:सरण वाहिनीचे काम पावसाळयापुर्वी करणे आवश्यक असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी कंत्राटदार यांना बोलविले असता वाटाघाटीअंती त्यांनी दर कमी करून 31% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे.**

**करीता श्री.अ.कदीर शे.रहीम यांची दराचे वाटाघाटीनुसार 49% जास्त ऐवजी 31% जास्त दराची निविदा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 10 मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मंडई या रस्त्यामध्ये दोन्ही बाजुस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम श्री.अ.कदीर शे.रहीम यांचेकडून 49% जास्त ऐवजी 31% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 11 :**

**मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला पैठणगेट येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील सादिया व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र.9 बी संबंधाने अर्जदार श्री.द्वारकादास अनंतराव सरदेशपांडे यांनी जमा केलेली अनामत रक्कम रू.58184/- परत मिळणेकरीता विनंती केली आहे.**

**सदर दुकान संबंधीतांनी दि.23/03/95 चे पत्रान्वये वृत्तपत्रात दिलेल्या जाहिर निविदा संबंधाने निविदा कार्यवाहीने भाडे तत्वावर घेतले मात्र या संबंधाने पुढील काळात आगाऊ भाडे भरणा करून करारनामा करून दुकान गाळा नाल्यात घेण्याची कार्यवाही केली नाही, म्हणुन सदर दुकान / गाळयासाठी निविदा सोबत जमा केलेली अनामत रक्कम रू.58184/- महानगरपालिकेकडून जप्त करण्यात येऊन दुकान इतरास भाडे तत्वावर देण्यात आले. संबंधीतांना तसे दि.23/12/2008 चे पत्राने कळविण्यात आले आहे. त्यानंतरही संबंधीतांना त्यांचे विनंती संबंधाने तसे अवगत केले असता त्यांनी पुन: विनंती अर्ज करून ते 80% अपंग असून वृध्द गृहस्थ असल्याने उदरनिर्वाहासाठी सदर दुकान भाडे तत्वावर घेतल्याचे नमूद करून दुर्दैवाने नंतरच्या कालावधीत प्रकृती खालाविल्याने त्यांना दुकान ताब्यात घेता आले नाही हे स्पष्ट करून सबब वृध्दापकाळ व 80% अपंगत्व विचारात घेऊन जमा केलेली अनामत रक्कम रू.58184/- परत देण्याची मागणी केली आहे. सदर मागणी विनंती मंजूर करता येत नाही असे संबंधीतांना यापूर्वी अवगत केले आहे.**

**तथापी, संबंधीतांनी या संबंधाने पुन: विनंती केल्याने याबाबत मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व निर्णयास्तव प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. मा.स्थायी समितीचे निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 11 मंजूर.**

**श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत श्री.सरदेशपांडे हे अपंग असुन त्यांनी मनपाकडे एक गाळा मागीतला होता. मनपामध्ये अनामत रक्कमही भरली होती. परंतु त्यांच्या अपंगत्वामुळे व्यवसाय चालू करू शकले नाही. मनपाने तो गाळा दुसऱ्याला देवुन टाकला आहे. 58 हजार रूपये त्यांनी भरलेली ती रक्कम मनपाने रिलीज केलेली नाही. दोन वर्षापासून सदरील विषय सात्यत्याने चर्चेला येत आहे. विषयाला मंजूरी देऊन यावर ताबडतोब कार्यवाही करून त्याचा अहवाल पुढील बैठकीत माहीती देण्यात यावी.**

**मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी याची नोंद घ्यावी.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला पैठणगेट येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील सादिया व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र.9 बी संबंधाने अर्जदार श्री.द्वारकादास अनंतराव सरदेशपांडे यांनी जमा केलेली अनामत रक्कम रू.58184/- परत मिळणेकरीता पून: विनंती केली असल्यामूळे तसेच संबंधीताचा वृध्दापकाळ व 80% अपंगत्व विचारात घेता त्यांनी जमा केलेली अनामत रक्कम रू.58184/- परत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**

**महानगरपालिका औरंगाबाद**